# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र

# दिनांक - 31/08/2020

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

---

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

**प्रति,**

प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

# भाग ५ - शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती

क्रमांकःपोअय/डीपी/३१-बी/पोहवा-८६८ कुडमेथे/निलंबन/ ७१५८ /२०२० यवतमाळ दिनांक 31 AUG 2020

## निलंबन आदेश

**अपचारी -** पोहवा/८६८ ज्ञानेश्वर कुडमेथे, नेमणुक पोलीस स्टेशन दारव्हा.

आपण पोहवा/८६८ ज्ञानेश्वर कुडमेथे, पो.स्टे. दारव्हा येथे नेमणुकीस असुन दिनांक ०४/०७/२०२० रोजी आपली डयुटी टिळकवाडी कंटेन्मेंट झोन संग्राम चौक पॉईट या महत्वाचे ठिकाणी वेळ २१.०० वाजता ते सकाळी ०९.०० वाजेपावेतो डयुटी नेमली असता २३.०० वाजता चे सुमारास पो.उप.नि. खाडे यांनी सदर कंटेन्मेंट झोन पारिसरात पेट्रोलींग करुन चेक केले असता, आपण कर्तव्यावर दारु पिऊन असल्याचे आढळुण आले. याबाबत पो.स्टे. दारव्हा डयुटी ऑफीसर सपोनि/लिगांडे यांना दुरध्वनीव्दारे सुचना दिली यावरुन सपोनि लिगांडे यांनी सदर ठिकाणी जावुन शहानिशा केली असता आपण कर्तव्यावर असतांना दारु पिऊन असल्याबाबत आढळुण आल्यामुळे त्यांनी आपली उपजिल्हा रुग्णालय दारव्हा वैदयकीय अधिकारी यांचकडुन वैदयकीय तपासणी करवुन घेतली असता आपण दारुचे सेवन केल्याचे व दारुचे अमलाखाली असल्याचे वैदयकीय प्रमाणपत्रात नमुद करण्यात आलेले आहे. आपण कर्तव्यावर नेमणुकीस असतांना वैयक्तीक जबाबदारी पार न पाडता नियमांचा भंग करुन अशोभनिय असे नियमबाहय व बेशिस्तपणाचे वर्तन केले आहे. तसेच आपण नेहमी कर्तव्यावर दारुचे नशेत व कर्तव्यावर गैरहजर राहण्याचे सवईचे आहात.

आपल्या या कृत्यामुळे आपण महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणुक १९७९ चे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले आहे. आपण शिस्तप्रीय अशा पोलीस दलात कार्यारत असुन व आपणास पोलीस दलाचे सेवेचा दिर्घकाळ अनुभव असतांना सुध्दा आपण कर्तव्यावर असतांना दारुचे सेवन करुन आपले पदास अशोभनिय असे कृत्य केले आहे. आपल्या या कृत्यामुळे पो.स्टे. मधील इतर पोलीस कर्मचारी यांचेवर विपरित परिणाम होवुन त्यांना सुध्दा दारु प्राशन करण्यास प्रोत्साहन मिळुन पोलीस स्टेशन मधील शिस्तीस बाधा पोहचवु शकते. त्यामुळे तुमच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे ठरविले आहे. सदर प्रकरण चौकशीत आहे म्हणुन मी पोलीस अधिक्षक यवतमाळ, मुंबई पोलीस (शिक्षा आणी अपीले ) नियम १९५६ नियम क्र. ३ मधील पोट नियम ३ (१) (a-२) नुसार आपणास आदेश निर्गमीत झाल्याचे दिनांकापासुन त्वरीत प्रभावाने निलंबित करण्यात येत आहे.

२. निलंबन काळात आपले मुख्यालय, **उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय वणी** हे निश्चीत करण्यात येत आहे. आपले निलंबन काळात आपण उप विभागीय पोलीस अधिकारी वणी हयांचे पुर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडु नये. या निश्चीत केलेल्या मुख्यालयात आपण दररोज न चुकता हजेरी द्यावी.

३. निलंबन काळात आपणांस निर्वाह भत्ता अस्तीत्वात असलेल्या नियमाप्रमाणे देण्यात येईल. आपण दर महिन्याला निर्वाह भत्ता घेण्यापुर्वी अगोदरच्या महिन्यात (ज्या महिन्याचा त्यांना निर्वाह भत्ता घ्यावयाचा आहे तो महिना) आपण कोणतीही खाजगी नोकरी अथवा कोणताही खाजगी व्यवसाय/ उद्योग केलेला नाही त्याबद्दलचे प्रमाणपत्र द्यावे लागेल.

४. आपणांस असेही सुचीत करण्यात येते की, निलंबन काळातही आपण पोलीस कर्मचारी म्हणुन राहाल निलंबित नसतांना जी जबाबदारी शिस्त व शिक्षा आपणांस लागु होत्या त्याच त्यानां आताही लागु राहतील. फक्त आपले अधिकार कार्य व विशेष सुविधा निलंबन काळात तात्पुरते तहकुब राहतील.

५. पुढे आपणांस असेही सुचीत करण्यात येते की, निलंबन काळात कोणतीही खाजगी नोकरी अथवा व्यवसाय/ उद्योग करण्याची आपणांस परवानगी नाही. जर आपण आपले निलंबन काळात खाजगी नोकरी अथवा खाजगी व्यवसाय/उद्योग केला तर ही गैरवर्तणुक ठरेल व त्याबद्दल आपले विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. अशा प्रकरणात आपला निर्वाह भत्त्यावर अधिकार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

**( एम. राज कुमार )**
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

**प्रति,** पोहवा/८६८ ज्ञानेश्वर कुडमेथे, नेमणुक पो.स्टे. दारव्हा.

**मार्फत :-** प्रभारी अधिकारी, पो.स्टे. दारव्हा.

२/- उपरोक्त आदेशाची दोन (२) प्रति पाठविण्यात येत असुन मूळ प्रत सबंधितांस अदा करुन दुय्यम प्रतिवर दिनांकासह स्वाक्षरी घेवुन दुय्यम प्रत तात्काळ या कार्यालयास सादर करण्यात यावी.

**प्रत :-** उपविपोअ वणी/ पोउपअधि(मुख्या)/वेतन लिपीक -१/डीपीजी लिपीक/ कर्मचारी आस्थापना लिपीक/सआली-०२ यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.